

| वर्ष - 7 | अंक - 260 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 31 जानेवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत


- न्यूझीलंडसमोर २९६ धावांचे लक्ष्य
- शाहरुखने ब्रेक का घेतला
- नितीश कुमार कुठे फसले?
- अशोक सराफ यांना महाराष्ट्र भूषण


## कथित स्पर्श घोटाळा अन् राजकीय कुरघोड्या!

# राष्ट्रवादी शरद पवार गट ‘टार्गेट’!

।पिंपरी। महाईन्यूज ।विशेष प्रतिनिधी।

**कोविड महामारीच्या काळात पिंपरी-चिंचवड महापालिकेतील कथित स्पर्श हॉस्पिटल घोटाळ्यामुळे शहराची संपूर्ण राज्यात बदनामी झाली. त्यावेळी महापालिकेत भाजपाची आणि राज्यात महाविकास आघाडीची सत्ता होती. परस्पर विरोधी सत्ता आणि अधिकाऱ्यांच्या ‘नरो वा कुजरो वा’ भूमिकेमुळे या प्रकरणाची सोयीनुसार चिरफाड झाली. त्यामुळे ठेकेदार संस्था, सल्लागार यांच्यात प्रचंड अस्वस्थता आहे. कोविडमध्ये बेड, ऑक्सिजन, व्हेंटीलेटर आणि रेमडीसीव्हर आदींसाठी नागरिकांची झालेली परवड आणि आणीबाणी सदृश्य परिस्थिती प्रत्येकाने अनुभवली आहे. या काळात कोविड बाधित लोकांना उपचार मिळणे आवश्यक होते. त्यासाठी त्यावेळच्या अधिकाऱ्यांनी नियमावली आणि दरपत्रकापेक्षा लोकांच्या आरोग्याला महत्त्व दिले, हे तात्विकदृष्ट्या रास्तच होते.**


## मविआच्या सत्ताकाळात ‘क्लिनचीट’ : महायुतीमध्ये मात्र आरोपीच्या पिंजऱ्यात ?















स्पर्शप्रमाणे अन्य रुग्णालयांनीही त्या काळात महापालिकेचे कोविड सेंटर आणि अन्य कामे घेतली आहेत. कम्युनिटी किचन, मास्क खरेदी, वैद्यकीय साहित्य खरेदी सारखी कामेही अनेक ठेकेदारांनी घेतली आहेत. आजच्या घडीला सर्वांचीच चौकशी केली, तर एकही काम नियमात नसेल, हे सांगण्यासाठी कोणत्याही ज्योतिषाची आवश्यकता नाही. मग, स्पर्श प्रकरणालाच फुंकर का घातली गेली? त्यावर महापालिका सभागृहात आणि सभागृहाबाहेरही घमासान का झाले? या सर्व बाबींवर प्रकाश टाकणे महत्त्वाचे ठरते.

‘स्पर्श प्रकरण’ हा एक राजकीय सूडबुद्धीतून निर्माण झालेला कथित घोटाळा आहे. यासाठी त्यावेळची राजकीय परिस्थिती कारणीभूत आहे. कोविड काळात महाविकास आघाडीची सत्ता राज्यात होती. पालकमंत्री व उपमुख्यमंत्री अजित पवार होते. पण, महापालिकेत भाजपाची सत्ता होती. त्यामुळे भाजपाला कोंडीत पकडण्याची एकही संधी त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसने सोडली नाही. स्पर्श प्रकरणामध्ये तत्कालीन राष्ट्रवादीच्या नगरसेविका सुलक्षणा शिलवंत आणि भाजपाचे नगरसेवक तुषार कामठे यांची नावे चर्चेत आली. शिलवंत आणि कामठे यांनी अजित पवार यांच्या ‘गुडबूक’मध्ये स्थान मिळवले होते. त्याद्वारे महापालिका प्रशासनावर वचक निर्माण केला होता.

दुसरीकडे, राष्ट्रवादीचेच माजी महापौर योगेश बहल यांनी सभागृहात आणि सभागृहाबाहेरही स्पर्शविरोधात वातावरण तापवले होते. हा वाद स्पर्श पुरता मर्यादित नव्हता, तर बहल-शिलवंत राजकीय सत्तासंघर्षातील ठिणगीतून निर्माण झालेला तीव्र भडका होता. तुषार कामठे यांच्या भाजपा पक्षविरोधी भूमिकांमुळे त्याला फुंकर मिळाली, ही वस्तुस्थिती आहे. दरम्यान, तुषार कामठे यांनी भाजपाला रामराम ठोकला आणि अपेक्षेप्रमाणे अजित पवार यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रवादीत प्रवेश केला. त्यावेळी तत्कालीन आयुक्त राजीव जाधव यांनी स्पर्श प्रकरणात एकप्रकारे ‘क्लिन चीट’ दिली आहे, ही बाब अधोरेखित करण्यासारखी आहे.

### “ विधानसभा निवडणुकीची पायाभरणी...

महाविकास आघाडीच्या सत्ताकाळातील तत्कालीन आयुक्त राजेश पाटील यांच्या अहवालानुसार स्पर्श प्रकरणात संबंधित संस्थेला ‘क्लिनचीट’ मिळते. पण, महायुतीच्या सत्ताकाळातील आयुक्त शेखर सिंह यांच्याकाळात पूर्वीच्या आयुक्तांचा खुलासा, विभागीय आयुक्तांचा खुलासा असतानाही स्पर्श संस्थेबाबत साशंकता निर्माण केली जाते, याला राजकीय किनार आहे. कारण, या प्रकरणात चर्चेत असलेले राष्ट्रवादी शरद पवार गटाचे तुषार कामठे आणि माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत आजच्या घडीला विरोधी बाकावर आहेत. कामठे चिंचवडमधून आणि शिलवंत पिंपरीतून महाविकास आघाडीचे विधानसभा निवडणुकीत संभाव्य उमेदवार आहेत. त्यामुळे स्पर्शच्या राष्ट्रवादी अजित पवार गट विरोधी शरद पवार गटाला शह देण्याचा प्रयत्न करीत आहे, असे चित्र आहे.

## राज्यातील सत्ता बदल अन् राजकीय ‘टर्निंग पॉईंट...’

राज्यात सत्ता बदल झाला आणि एकनाथ शिंदे गट आणि भाजपा असे सरकार स्थापन झाले. त्या वर्षभराच्या काळातही स्पर्शबाबत चक्कार शब्द कोणी काढला नाही. पण, राष्ट्रवादीतील अजित पवार गट महायुती सरकारमध्ये सहभागी झाला. राष्ट्रवादीत दोन गट पडले आणि सुलक्षणा शिलवंत आणि तुषार कामठे यांनी शरद पवार यांच्यासोबत जाण्याचा निर्णय घेतला. हाच स्पर्श प्रकरणाला राजकीय ‘टर्निंग पॉईंट’ ठरला. राष्ट्रवादीत असताना योगेश बहल यांना शिलवंत आणि कामठे यांना शह देता येत नव्हता. योगायोगाने उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री म्हणून अजित पवार पुन्हा सत्तेत आले. या संधीचे सोने करीत योगेश बहल यांनी आपल्या प्रचंड अनुभवाच्या आधारे स्पर्श प्रकरणाची फाईल पुन्हा उजेडात आणली. शरद पवार गटाचे शहराध्यक्ष असलेले तुषार कामठे आणि पिंपरी विधानसभा निवडणुकीच्या तीव्र दावेदार सुलक्षणा शिलवंत यांना राजकीयदृष्ट्या ‘डॅमेज’ करण्यासाठी माजी महापौर योगेश बहल यांनी दंड थोपटले. स्पर्श व्यवस्थापनाच्या आडून कामठे आणि शिलवंत यांचा ‘करेक्ट कार्यक्रम’ करण्याची संधी सोडली नाही. त्यामुळेच आयुक्त शेखर सिंह यांचा अहवाल सादर झाल्यानंतर बहल यांनी प्रसिद्धपत्रक काढले आणि स्पर्शवर कारवाई झाल्याचे रान पेटवले. कारण, या प्रकरणात राजकीयदृष्ट्या कामठे व शिलवंत ‘टार्गेट’ होणार आहेत.

## मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय काय सांगतो?

महापालिका प्रशासनाने स्पर्श हॉस्पिटलची थकीत बिले राखून ठेवली होती. त्याबाबत महापालिकेच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. उच्च न्यायालयाने याबाबत महापालिकेकडे खुलासा मागवला होता. दि. २ जानेवारी २०२४ रोजी विद्यमान आयुक्त शेखर सिंह यांच्यामार्फत पत्राद्वारे खुलासा देण्यात आला की, स्पर्श हॉस्पिटलला हिरा लॉन्स व राम स्मृती लॉन्स येथील स्पर्श संस्थेद्वारे कार्यान्वित कोविड केअर सेंटरसाठी ३ कोटी २९ लाख ५४४ रुपये एवढी बिले अदा करण्यात आली. पण, यामध्ये तथाकथित घोटाळ्यांच्या आरोपांवरून विभागीय आयुक्तांमार्फत चौकशीचे आदेश दिले आहेत. यावर न्यायालयाने स्पर्श संस्थेने थकीत रक्कमेबाबत स्वतंत्र याचिका दाखल करावी आणि महापालिका प्रशासनाने उर्वरित रक्कम स्पर्श संस्थेला द्यावी, असे आदेश दिले आहेत. त्यामुळे स्पर्श संस्थेकडे स्वतंत्र याचिका दाखल करण्याचा ‘कॉल’ अद्याप आहे. तसेच, उर्वरित रक्कम मिळवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# नियम मोडणाऱ्याचा परवाना होतोय रद्द!

## दररोज सरासरी तीन वाहनचालकांवर कारवाई

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**शहरातील वाहतुकीची शिस्त दिवसेंदिवस बिघडत आहे. त्यामुळे नियम न पाळणाऱ्या वाहनचालकांचा परवाना निलंबित करण्याचे पाऊल उचलण्यात आले आहे. गेल्या वर्षी एक हजारहून अधिक वाहनचालकांचे परवाने ३ ते ६ महिन्यांपर्यंत निलंबित करण्यात आले आहेत. दररोज सरासरी तीन वाहनचालकांवर ही कारवाई झाली आहे.**



वाहतूक पोलीस आणि प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (आरटीओ) ही कारवाई झाली आहे. वाहतुकीच्या नियमांचा वारंवार भंग करणाऱ्या वाहनचालकांची यादी वाहतूक पोलिसांकडून आरटीओला पाठविली जाते. या वाहनचालकांचा परवाना निलंबित करावा, अशी शिफारसही करण्यात येते. पोलिसांनी पाठविलेल्या प्रस्तावावर आरटीओकडून दर महिन्याच्या अखेरीस कारवाई केली जाते. त्यात पोलिसांनी दिलेल्या गुन्ह्यानुसार वाहनचालकांचा परवाना तीन ते सहा महिन्यांपर्यंत निलंबित केला जातो.गेल्या वर्षी आरटीओकडून १ हजार ३ वाहनचालकांचे परवाने निलंबित करण्यात आले. मद्यप्राशन करून वाहन चालविणे, अतिवेगाने वाहन चालविणे, सिग्नल तोडणे, हेल्मेट न परिधान करणे, वाहन चालविताना मोबाइलवर बोलणे, क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक, क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक या नियमांचा भंग करणाऱ्या वाहनचालकांवर ही कारवाई केली जाते. आरटीओकडून परवाना निलंबित करण्यात आल्याची माहिती संबंधित वाहनचालकाला ऑनलाइन दिली जाते.

परवाना निलंबनाच्या कालावधीत चालक वाहन चालविताना आढळल्यास त्याच्यावर पाच हजार रुपयांची दंडात्मक कारवाई करून त्यांचे वाहनही जप्त केले जाऊ शकते. वाहतूक पोलीस आणि प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (आरटीओ) ही कारवाई झाली आहे. वाहतुकीच्या नियमांचा वारंवार भंग करणाऱ्या वाहनचालकांची यादी वाहतूक पोलिसांकडून आरटीओला पाठविली जाते. या वाहनचालकांचा परवाना निलंबित करावा, अशी शिफारसही करण्यात येते. पोलिसांनी पाठविलेल्या प्रस्तावावर आरटीओकडून दर महिन्याच्या अखेरीस कारवाई केली जाते. त्यात पोलिसांनी दिलेल्या गुन्ह्यानुसार वाहनचालकांचा परवाना तीन ते सहा महिन्यांपर्यंत निलंबित केला जातो.गेल्या वर्षी आरटीओकडून १ हजार ३ वाहनचालकांचे परवाने निलंबित करण्यात आले. मद्यप्राशन करून वाहन चालविणे, अतिवेगाने वाहन चालविणे, सिग्नल तोडणे, हेल्मेट न परिधान करणे, वाहन चालविताना मोबाइलवर बोलणे, क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक,

> बेशिस्त वाहनचालकांवर परवाना निलंबनाची कारवाई केली जाते. निलंबनाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर वाहनचालकांना पुन्हा वाहन चालविता येते. यात केवळ मद्यप्राशन करून वाहन चालविण्याच्या गुन्ह्याचा अपवाद आहे. त्यांना वाहनाची तंदुरुस्ती तपासणी आणि वाहन चालविण्याची चाचणी पुन्हा द्यावी लागते. त्यानंतर त्यांना पुन्हा परवाना मिळू शकतो.
>
> **– संजीव भोर,** प्रभारी प्रादेशिक परिवहन अधिकारी

> वाहतूक नियमांचा वारंवार भंग करणाऱ्या वाहनचालकांवर अंकुश राहावा, यासाठी परवाना निलंबित करण्याची शिफारस वाहतूक पोलिसांनी आरटीओकडे केली होती. तीन ते चार वेळा नियमभंग करणाऱ्यांवर ही कारवाई प्रामुख्याने करण्यात आली आहे. परवाना निलंबित झाल्यानंतर संबंधित व्यक्तीला त्या कालावधीत वाहन चालविता येत नाही.
>
> **– शशिकांत बोराटे,** पोलीस उपायुक्त, वाहतूक शाखा

क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक या नियमांचा भंग करणाऱ्या वाहनचालकांवर ही कारवाई केली जाते. शहरातील वाहतुकीची शिस्त दिवसेंदिवस बिघडत आहे. त्यामुळे नियम न पाळणाऱ्या वाहनचालकांचा परवाना निलंबित करण्याचे पाऊल उचलण्यात आले आहे. गेल्या वर्षी एक हजारहून अधिक वाहनचालकांचे परवाने ३ ते ६ महिन्यांपर्यंत निलंबित करण्यात आले आहेत. दररोज सरासरी तीन वाहनचालकांवर ही कारवाई झाली आहे. पोलिसांनी दिलेल्या गुन्ह्यानुसार वाहनचालकांचा परवाना तीन ते सहा महिन्यांपर्यंत निलंबित केला जातो.गेल्या वर्षी आरटीओकडून १ हजार ३ वाहनचालकांचे परवाने निलंबित करण्यात आले. मद्यप्राशन करून वाहन चालविणे, अतिवेगाने वाहन चालविणे, सिग्नल तोडणे, हेल्मेट न परिधान करणे, वाहन चालविताना मोबाइलवर बोलणे, क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक, क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक या नियमांचा भंग करणाऱ्या वाहनचालकांवर ही कारवाई केली जाते.

---

# पुणे लोकसभेसाठी रवींद्र धंगेकरांचं नाव आघाडीवर

## कसबा पोटनिवडणुकीवेळची जादू लोकसभेतही होणार का?

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सर्वच राजकीय पक्ष तयारीला लागलेत. अनेक दौरे, चर्चा, बैठकींनंतर आता उमेदवार निश्चित होत आलेत. राज्यातील सर्वच जागांसाठी महाविकास आघाडी आणि महायुती यांच्यामध्ये रस्सीखेच पाहायला मिळत आहे. गेल्या काही दिवसांपासून वेगवेगळ्या मतदारसंघावर अनेक पक्षांनी दावा सांगायला सुरुवात केली आहे. यामध्ये महाविकास आघाडीतर्फे कुठला उमेदवार देण्यात येईल याची उत्सुकता होती.**



कसबा विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर हे गेल्या काही दिवसांपूर्वी पुणे शहर लोकसभेचे उमेदवार म्हणून इच्छुक असल्याच्या चर्चा सुरू आहेत. महाविकास आघाडीकडून रवींद्र धंगेकर हेच नाव सध्या आघाडीवर आहे. काँग्रेसचे कसबा विधानसभेचे आमदार रवींद्र धंगेकर 2023 मध्ये कसबा विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपच्या हेमंत रासने यांचा पराभव करत विजयी झाले. माजी आमदार मुक्ता टिळक यांच्या निधनानंतर कसबा पेठेतील जागा रिक्त झाली होती. कसबा पेठ भाजपचा बालेकिल्ला असून

### गरजेनुसार चर्चासत्र घेतले जाईल

काँग्रेसचे रवींद्र धंगेकर विरुद्ध भाजपचे हेमंत रासने अशी ही निवडणूक झाली. या निवडणुकीत अनेक दिग्गज नेत्यांनी हजेरी लावली, प्रचार सभा घेतल्या आणि रवींद्र धंगेकर त्यांचे काम आणि लोकप्रियतेमुळे विजयी झाले. या निवडणुकीत महाविकास आघाडीकडून मोठ्या प्रमाणात ताकद लावण्यात आली होती. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून देखील सभा घेतल्या जात होत्या. सन 2014 आणि 2019 च्या मोदी उदयानंतर काँग्रेसचे रवींद्र धंगेकर यांचं इतक्या मोठ्या मताधिक्याने जिंकून येणं हा काँग्रेस आणि आघाडीसाठी मोठा विजय होता.

रवींद्र धंगेकर यांनी कसबापेठ पोटनिवडणुकीत बाजी मारली. महविकास आघाडीकडून काँग्रेसचे कसबा पेठ विधानसभा आमदार रवींद्र धंगेकर यांचं नाव आघाडीवर आहे. विधानसभा आणि लोकसभा या दोन्ही निवडणुकांमध्ये मोदी लाटेनंतर काँग्रेसला आहोटी लागली. 2014 आणि 2019 मध्ये सर्वाधिक भाजप महायुतीने जागा जिंकल्या होत्या. मात्र 2023 मध्ये झालेली कसबा विधानसभा पोटनिवडणूक रंगतदार आणि प्रतिष्ठेची झाली होती.

# कर संकलन विभागाची दमदार कामगिरी!

## 700 कोटींचा टप्पा पार..! सहा लाख 15 हजार मालमत्ता धारकांपैकी 4 लाख 21 हजार मालमत्ता धारकांनी भरला कर

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाची दमदार कामगिरी सुरूच असून दहा महिन्यात तब्बल ७०० कोटी रूपयांचा टप्पा पार केला आहे. उर्वरित दोन महिन्यात जास्तीत-जास्त कर वसूल करण्यासाठी विभागाने आता थकबाकीदारांच्या मालमत्ता जिथे सील करता येणे शक्य नाही त्या ठिकाणी जप्त' करण्याचा प्रथमच मोठा निर्णय घेतला आहे. त्यामुळे थकबाकीदारांनी मालमत्ता जप्त होऊ नये, यासाठी त्वरित कर भरून पालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पिंपरी-चिंचवड शहरात सहा लाख १५ हजार मालमत्ता आहेत. यापैकी तब्बल ४ लाख २१ हजार**



मालमत्ता धारकांनी ७१६ कोटी ४० लाख रूपयांचा भरणा करून शहर विकासात योगदान दिले आहे. त्याबद्दल पालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी या जबाबदार आणि जागरूक करदात्यांचे मनस्वी आभार मानले आहेत. जनजागृती, वारंवार आवाहन, जप्ती पूर्व नोटीस, मोबाईलवर एसएमएस पाठवून थकबाकीदारांना कर भरण्याबाबत सुचित करण्यात आले आहे. मात्र, त्यानंतरही कर न भरणाऱ्या मालमत्ता धारकांबाबत कठोर पाऊले उचलण्यास कर संकलन विभागाने सुरूवात केली आहे.

शहरात थकबाकीदारांमध्ये रहिवाशी मालमत्तांची संख्या मोठी आहे. अशा मालमत्ता धारकांना पाच वेळा भेटी देऊन कर भरण्याबाबत सूचना केल्या, मालमत्ता जप्त होण्याचा इशारा दिला. त्यानंतरही थकबाकीदार नागरिक कर भरण्यास प्रतिसाद देत नाहीत. वास्तविक मानवतेच्या दृष्टीकोनातून रहिवाशी सदनिका महापालिका सील करत नाहीत. मात्र, आता यापुढे अशा थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करण्यात येणार आहे. मात्र ही जप्ती मालमत्ता सिल न करता किंवा कुठलीही जंगम मालमत्ता जप्त न करता केली जाणार आहे. त्यासाठी सदर मालमत्तेवर जप्ती अधिपत्र डकवले जात आहे. रहिवास करत असलेले थकबाकीदार आर्थिक क्षमता असूनही कुठल्याही पाठपुराव्याला प्रतिसाद देत नसल्याचे निदर्शनास आले आहे. अशा रहिवाशी मालमत्तांकडे जवळपास ३०० कोटीच्या वर थकबाकी आहे. यापूर्वी बंद असलेल्या रहिवाशी सदनिका बंद असल्याने सील केल्या होत्या. गत वर्षी त्यांची संख्या ७० च्यावर होती. यावर्षी अशा जप्त केलेल्या मालमत्तांची संख्या १०० च्यावर गेली आहे आणि ही कारवाई ३१ मार्चपर्यंत चालू राहणार आहे.

### 283 मालमत्ता जप्त; 98 मालमत्तांना अधिपत्र डकविले

वारंवार आवाहन करूनही कर न भरणाऱ्या १७ झोनमधील तब्बल २८३ मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत. यापैकी ९८ निवासी मालमत्तांना अधिपत्र डकविले आहे. यानंतरही थकीत कर न भरल्यास संबंधित मालमत्ता धारकांच्या मालमत्तेचा जाहीर लिलाव करण्याचा इशारा कर आकारणी व कर संकलन विभागाच्या वतीने देण्यात आला आहे.

### 25 मालमत्तांच्या लिलावाची प्रकिया चालू..

महापालिकेने थकबाकी असलेल्या २८३ मालमत्ता जप्त केल्या आहेत. यामधील ९८ मालमत्तांचे मूल्यांकन करण्यात येत आहे. त्यापैकी २५ मालमत्तांचे मूल्यांकन पूर्ण झाले असून पहिल्या टप्प्यात या मालमत्तांचा जाहीर लिलाव लवकरच करण्यात येणार आहे. तसेच उर्वरित मालमत्तांचे वेगाने मूल्यांकन करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

२८ नळ कनेक्शन खंडीत..

थकीत कर न भरणाऱ्या मालमत्ता धारकांचे महापालिकेच्या वतीने आता नळजोडणी तोडण्यासारखी नाईलाजाने कठोर कारवाई करण्यात येत आहे. आतापर्यंत २८ मालमत्ता धारकांचे नळजोड खंडित करण्यात आले आहेत.

### जप्ती अधिपत्रांचे सूक्ष्म नियोजन..

50 हजार रुपयांहून अधिक थकबाकी असलेल्या 22 हजार मालमत्तांची जप्ती अधिपत्र काढण्यात आली आहेत. 8 हजार अधिपत्राची अंमलबजावणी केली आहे. उर्वरित 14 हजार अधिपत्रांची 31 मार्चपर्यंत शंभर टक्के अंमलबजावणी केली जाणार आहे. यासाठी कर संकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी सूक्ष्म नियोजन केले आहे. त्यानुसार प्रत्येक झोनला निवासी, बिगर निवासी किती जप्त्या करायच्या, नळजोड किती खंडित करायचे, यांचे दैनंदिन उदिष्ट ठरवून देण्यात आले आहे. त्याचबरोबर टेलिकॉलिंग किती करायचे, यांचे नियोजन केले आहे. टेलिकॉलिंगच्या माध्यमातून जवळपास दररोज चार हजार थकबाकीदारांना फोन केले जात आहेत. याचाही कर संकलन विभागाला मोठा फायदा होत आहे.

“शहरात सध्या मालमत्ता कर नोंदणी अभियान सुरू आहे. त्यामध्ये साडे चार लाखापेक्षा जास्त मालमत्तांचे GEO -SEQUENCING करण्यात आले आहे. जवळपास 1 लाख मालमत्तांची अंतर्गत मोजणी आणि आवश्यक माहिती संकलित करण्यात आलेली आहे. महापालिका वेगवेगळे पर्यावरणपूरक उपक्रम राबवणाऱ्या सोसायटया, महिला, दिव्यांग, माजी सैनिक यांना अनेक सवलती देत असते. या सवलती देण्यासाठी “पालिका आपल्या दारी” असे हे अभियान राबवण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार गत वर्षीच्या तुलनेत या वर्षी 12% कर उत्पन्न वाढ नोंदवणे 15व्या वित्त आयोगाच्या अनुदानासाठी आवश्यक आहे.

– **शेखर सिंह,** आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

---

# जगद्गुरु संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अॅन्ड ज्युनियर कॉलेजची सोडत!

## प्रशासनाची माहिती: 172 प्रवेश अर्जांपैकी 160 विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये नर्सरी वर्गासाठी आलेल्या एकूण ३१५ अर्जांपैकी सर्व नियमात बसणारे १७२ प्रवेश अर्जांपैकी जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अँन्ड ज्युनियर कॉलेज ची प्रवेश संख्या सोडत पद्धतीने १६० विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित करण्यात आला आहे..**



पिंपरी-चिंचवड महानगरपालिका संचलित पाटीलनगर टाळगाव चिखली येथे जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ कंपनी कायदा २०१३ च्या कलम ८ अंतर्गत स्थापन करण्यात आली आहे. तसेच जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ अंतर्गत सुरू झालेले स्कूल अँन्ड ज्युनियर कॉलेज हे महाराष्ट्र स्वयं अर्थसंहाय्यित शाळा (स्थापना व विनिमय) नियम २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर चालविण्यात येत आहे.जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अँन्ड ज्युनियर कॉलेज, पाटीलनगर, टाळगाव चिखली येथे शनिवार, दि. २७/०१/२०२४ रोजी विद्यार्थी प्रवेशाची सोडत पालकांच्या संमतीने व मान्यवरांसह पालकांच्या हस्ते पार पाडण्यात आली. याप्रसंगी संतपीठाचे संचालक राजूमहाराज ढोरे, डॉ.स्वाती मुळे संतपीठ प्राचार्य डॉ.ज्ञानेश्वर गाडगे, मुख्याध्यापिका स्नेहल पगार, समन्वयिका मयुरी मुळूक आदी मान्यवर, संतपीठ कर्मचारी वृंद यांसह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून विद्यार्थी सोडत पद्धत सुरु करण्यात आली.

### पारदर्शीपणे प्रवेश प्रक्रिया...

**जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अॅन्ड ज्युनियर कॉलेज, पाटीलनगर टाळगाव चिखली येथे शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये नर्सरी वर्गाच्या प्रवेश प्रक्रियेला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सदर शाळेमध्ये उच्च दर्जाचे शिक्षण मिळत असल्याने पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे संतपीठाच्या संचालकांनी सांगितले. निर्धारित केलेल्या प्रवेश क्षमतेपेक्षा दुपटीने अर्ज आल्याने ही प्रक्रिया व्यवस्थापनाच्या सूचनेनुसार सोडत पद्धतीने अतिशय पारदर्शी वातावरणात पार पडली.**

# उद्धवरावांचा रडीचा डाव




**माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या गटाने विधानसभा अध्यक्षांच्या निर्णयाच्या विरोधात महापत्रकार परिषद आयोजित करून जो 'मीडिया ट्रायल'चा प्रकार केला तो म्हणजे उद्धव ठाकरे यांचा रडीचा डाव आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा गट हाच खरा शिवसेना पक्ष आहे, त्यांची नेतेपदी निवड वैध आहे, शिवसेनेच्या प्रतोदपदी भारत गोगावले यांची निवड वैध आहे**

द्धवगटाने मागणी केल्याप्रमाणे शिंदे व त्यांच्या सहकारी आमदारांना अपात्र ठरविता येणार नाही, असा निकाल विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलेला आहे. हा निकाल कसा चुकीचा आहे, हे उद्धव ठाकरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी महा पत्रकार परिषदेच्या माध्यमातून दाखविण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारे जनसुनावणी आयोजित करून वैधानिक पदावरील विधानसभा अध्यक्षांच्या निर्णयावर मात करता येत नाही, त्यासाठी सर्वोच्च न्यायालयाकडूनच निर्णय होणे आवश्यक आहे, हेसुद्धा उद्धव ठाकरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ध्यानात घेतले नाही.उद्धवराव व त्यांच्या सहकाऱ्यांनी वैधानिक प्रक्रियेचा कधी आदर केला नाही, यामुळेच मुळात त्यांच्या गटाचा निवडणूक आयोगासमोरील सुनावणीत पराभव झाला व त्यानंतर विधानसभा अध्यक्षांसमोरच्या सुनावणीत पराभव झाला. एका पाठोपाठ एक तांत्रिक चुका हा




गट करत गेला व त्यातून पराभव पदरी आल्यावर आरडाओरडा करत राहिला. पण भारतात संविधानाच्या आधारावर चालणारी प्रक्रिया आहे, त्यामध्ये अशा भावनिक आरडाओरड्याला स्थान नाही तर केवळ नियमांचे पालन आणि समोर आलेला स्पष्ट पुरावा याच्या आधारे निर्णय होतात. उद्धव ठाकरे यांच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात केस लढविणाऱ्या कपिल सिब्बल आदी जेष्ठ वकिलांना संवैधानिक प्रक्रिया, संविधानाचे महत्त्व, न्यायालयीन निर्णय प्रक्रिया याचे भान आहे. त्यामुळेच महापत्रकार परिषदेत कपिल सिब्बल यांच्यासह उद्धव ठाकरे गटाचे कोणतेही मातब्बर वकील उपस्थित राहिले नाहीत, असे दिसते. असीम सरोदे अशा सोशल मीडियावर सक्रिय असणाऱ्या आणि चित्रवाणी वृत्तवाहिन्यांसमोर ठाकरे गटाची वकिली करणाऱ्या तुलनेने नवख्या वकिलाला सोबत घेऊन उद्धव ठाकरे गटाला ही महापत्रकार परिषद पार पाडावी लागली. असीम सरोदे यांनी या कार्यक्रमात पक्षांतरबंदी कायद्याची चर्चा केली आणि विधानसभा अध्यक्षांचा निर्णय कसा चुकीचा आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला. मला आश्चर्य वाटते की, असीम सरोदे इतके ज्ञानी आहेत तर कपिल सिब्बल यांच्यासारख्या महागड्या वकिलापेक्षा त्यांनी सरोदे यांनाच सर्वोच्च न्यायालयात किंवा निवडणूक आयोगासमोर किंवा विधानसभा अध्यक्षांसमोर सुनावणीला का पाठवले नाही. मुद्दा स्पष्ट आहे की, अशा प्रकारे जाहीर कार्यक्रम करून निर्णयाची तथाकथित चिरफाड करण्याने न्यायालयीन प्रक्रियेला काही फरक पडत नाही आणि अशा प्रकारचे बालिश मुद्दे मांडणे चुकीचे आहे याची जाण असल्यानेच बहुधा उद्धव ठाकरे यांचे मान्यवर वकील तेथे आले नाहीत. एक महत्त्वाची अनुपस्थिती जाणवली. उद्धवरावांनी त्यांना घटनातज्ज्ञ वाटणारे आणि चित्रवाणी वृत्तवाहिन्यांनी 'विख्यात' केलेले संविधानतज्ज्ञ उल्हास बापट यांच्या तोंडूनही घटनेचे उल्लंघन वगैरे कार्यकर्त्यांना ऐकवले असते तर चित्र पूर्ण झाले असते !पक्ष संघटना चालविताना आणि जून २०२२ नंतरच्या घटनांमध्येही उद्धव ठाकरे यांनी कायदेशीर प्रक्रिया, पक्षाचे संविधान, निवडणूक आयोगाची कार्यपद्धती, न्यायालयीन प्रक्रिया, विधिमंडळाची नियमावली यापैकी कशाचीच पत्रास बाळगली नाही म्हणून उद्धव ठाकरे संकटात सापडले. या सगळ्या काळात त्यांना त्यांचे सहकारी अ‍ॅड. अनिल परब त्यांना कायदेशीर सल्ला देत नव्हते की काय अशी शंका वाटते किंवा परब यांनी सल्ला दिला असेल आणि तो उद्धवरावांनी मानला नसेल. उद्धव ठाकरे यांनी लोकशाहीचाही आदर केला नाही. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टी झ्र शिवसेना महायुतीला १६१ जागांसह स्पष्ट बहुमत जनतेने दिले. त्या निवडणूक निकालानंतर उद्धव ठाकरे यांनी सरकार स्थापनेबाबत भाजपासोबतची चर्चा बंद केली आणि नव्या सरकारबद्दल समस्या निर्माण झाली. असे स्पष्ट वक्तव्य केले होते. जनादेश स्पष्ट होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महायुतीला राज्यातील जनतेने बहुमत दिले होते. पण उद्धव ठाकरे यांनी लोकशाही पद्धतीतील या जनादेशाचाही आदर केला नाही.

## संपादकीय »

# लाळघोटे लटकले!

***ना धड सरकारी ना बाजारपेठीय अशा अर्थव्यवस्थांत सत्ताधाऱ्यांची हांजी हांजी करूनच उत्कर्ष साधणाऱ्यांचे काय होऊ शकते, हे 'एव्हरग्रांद'मुळे दिसले...***

बाजारपेठेस बाजाराच्या नियमाने तरी चालू द्यावे किंवा नियंत्रण ठेवावयाचे असेल तर ते निदान पूर्णपणे ठेवावे आणि होणाऱ्या परिणामांची मालकी घ्यावी, हा साधा संकेत. सोयीचे असताना बाजारास मुक्तद्वार द्यावयाचे आणि गैरसोयीच्या प्रसंगी बाजारपेठांवर सरकारी निर्बंध आणायचे हे धोक्याचे. म्हणायचे बाजारपेठीय अर्थव्यवस्था आणि प्रत्यक्षात बाजार मात्र सरकार नियंत्रित हा 'उडाला तर पक्षी, बुडाला तर बेडूक' छापाचा दुटप्पीपणा सरकार आणि बाजारपेठ या दोहोंच्या गळ्यास नख लावल्याखेरीज राहात नाही. शेजारी चीन हा या दुटप्पीपणाचा ढळढळीत बळी. एकीकडे चीन सरकारच्या धोरणात्मक उत्तेजनामुळे त्या देशात 'अलीबाबा'सारखा 'ॲमेझॉन'शी दोन हात करेल असा तगडा उद्योगसमूह तयार झाला. जॅक मा हा या 'अलीबाबा'चा प्रणेता. जॅक अमेरिकेत शिकून परत मायदेशी आलेला.

**मराठा आरक्षण आंदोलन अस्मितावादीच वाटेल, पण त्याला पाठिंबा आर्थिक न्यायासाठी मिळतो आहे. राजकीय अर्थव्यवस्थेत अशा घटना घडणे महत्त्वाचे आहे. कारण त्यातूनच आर्थिक राजकारणाच्या दृष्टीने काहीशी अज्ञानी असलेली आपली सामान्य जनता आपल्या अर्थव्यवस्थेचा अन्वयार्थ लावत जाते...**

# आंतरवली आंदोलनाचा आर्थिक अंतर्नाद!

ग्रामीण आणि निमशहरी भागांत राहणारा महाराष्ट्रातील मराठा समाज मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आरक्षणासाठी गेले काही महिने आक्रमक झाला होता; तो मुंबईच्या वेशीवरून विजयाचा गुलाल उधळत आता आपापल्या घरी परतला असेल. कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल एवढ्या संख्येने लोक जमा करणाऱ्या चळवळी सत्ताधीशांसाठी डोकेदुखी असतात. पण जर त्या सामान्य लोकांचे खरे प्रश्न हाताळत असतील तर, या चळवळींतून राजकारणाला जनकेंद्री बनविण्याचा प्रयत्नही होत आहे म्हणून समाजाला त्यांचा स्वीकार करावा लागतो. गेल्या आठवड्याभरातल्या घटनांनी मराठा आरक्षण अनेक पावले पुढे सरकले आहे असेच म्हणावे लागेल. पारंपरिकदृष्ट्या शेतीवर जगणारे बहुसंख्य मराठे सरकारने आम्हाला कुणबी घोषित करून कुणबी प्रवर्गाला आधीच उपलब्ध असलेल्या ओबीसी आरक्षणात आम्हाला समाविष्ट



करून घ्या अशी मागणी करू लागले, जी सरकारने जनरेट्याच्या दबावामुळे तत्त्वत: मान्य केली आहे. न्यायालयीन प्रक्रिया आणि तांत्रिक बाबीत आरक्षणाचा निर्णय अडकू नये, असा एक सततचा दबाव या आंदोलनाने सरकारवर तयार केला आहे. सरकारसाठी ही तारेवरची कसरत आहे आणि १६ फेब्रुवारीपर्यंत सर्व आक्षेप जमेस घेऊन अधिनियम प्रस्थापित होणे हा यातला नवा टप्पा आहे. थांबायला तयार नसणे हे या आंदोलनाचे एक प्रमुख वैशिष्ट्य, आणि नेमके तेच आज आपल्या सामान्य माणसाच्या अर्थव्यवस्थेचे व्यवच्छेदक लक्षणही बनत चालले आहे, हा योगायोग नाही. न्यायालयाच्या तारखा आणि लोकसभेच्या आचारसंहितेत हा प्रश्न अडकण्याची शक्यता अजूनही दाट असली तरी सामान्य मराठा समाजातली जनजागृती ऐतिहासिक आहे.जागतिकीकरणात शेतकी अर्थव्यवस्था आणि संस्कृती उतरणीस लागली, शेतीला लोकसंख्या भार पेलेनाशी झाली, शहराकडे स्थलांतर वाढले. या पार्श्वभूमीवर बदलणाऱ्या परिस्थितीशी जोडून घेण्यासाठी आणि टिकून राहण्यासाठीची एक अगतिक आक्रमकता भारतात तयार होताना दिसते. शेतीला सरकारी नोकऱ्यांचे पर्याय उभे करण्यासाठी म्हणून मराठा आरक्षणाचे आंदोलन होणे किंवा इतर राज्यांतही गुजरातमधील पाटीदार आंदोलनासारखी आंदोलने उभी राहणे हा याच प्रक्रियेचा परिपाक आहे. १९९१ पासून जागतिकीकरणाने जे काही चांगले आणि वाईट भारतीय समाजाला दिले तो पहिला टप्पा संपून आता एक देश आणि समाज म्हणून आपण एका नव्या स्थित्यंतरातून जातो आहोत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# अशोक सराफ यांना महाराष्ट्र भूषण!

## पुरस्कार मिळाल्यानंतर राज ठाकरेंकडून अभिनंदन

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अशी ही बनवाबनवीसह मराठीतील असंख्य मराठी चित्रपट आणि नाटकांतून रसिकमनाचे मनोरंजन करणारे मराठीतील ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना मानाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. कला क्षेत्रातील भरीव योगदानासाठी २०२३ सालचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार अशोक सराफांना जाहीर झाल्यानंतर सर्व स्तरांतून त्यांचं कौतुक केलं जातंय.रसिक मनाचे राजकारणी अशी ख्याती असलेल्या राज ठाकरे यांनीही अशोक सराफांचं अभिनंदन केलं आहे.**



“अशोक सराफ यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर झाला, त्याबद्दल अशोक सरांचे मनापासून अभिनंदन. मी मागे एकदा म्हणालो तसं, एकाच वेळेला सिनेमा, रंगभूमी आणि टीव्ही ह्या तिन्ही माध्यमांवर हुकूमत गाजवणारे चतुरस्त्र कलाकार ह्या देशाने खूप कमी पाहिले, अशोक सर त्यातले एक”, अशा शब्दांत राज ठाकरेंनी अशोक सराफ यांचं अभिनंदन केलं.“मराठीत कलाकारांचा अजिबात तुटवडा नाही, पण आपल्या भाषेच्या सीमा ओलांडून एखादा नट देशव्यापी ओळखला जातोय किंवा त्यासाठी प्रयत्न करतोय असं दिसत नाही. पण अशोक सर ह्या बाबतीत देखील अपवाद ठरले. महाराष्ट्र भूषणसारखे राज्यातील सर्वोच्च नागरी पुरस्कार कलाकरांना ते उमेदीत असताना मिळावेत असं मला वाटतं. अर्थात हे प्रत्येक वेळेला होतंच असं नाही पण अशोक सरांच्या बाबतीत राज्य सरकारने योग्य टप्प्यावर त्यांचा उचित सन्मान केला ह्याबद्दल राज्य सरकारचं पण मनापासून अभिनंद”, असंही ते म्हणाले.मूळचे बेळगावचे असणाऱ्या अशोक सराफ यांचा जन्म मुंबईत झाला.दक्षिण मुंबईतील चिखलवाडी या भागात त्यांचे बालपण गेलं. गोपीनाथ सावकार हे त्यांचे मामा होत. अशोक सराफ यांचे शिक्षण मुंबईतील डी.जी.टी. विद्यालयात झाले. त्यांना सुरुवातीपासूनच नाटकांची अतिशय आवड होती. वयाच्या अठराव्या वर्षी त्यांनी शिरवाडकरांच्या ‘ ययाती आणि देवयानी ‘ या नाटकातील विदूषकाच्या भूमिकेद्वारा व्यावसायिक रंगभूमीवर पाऊल ठेवलं. काही संगीत नाटकांतूनदेखील त्यांनी भूमिका केल्या. त्यांची आजवरची लक्षात राहिलेली भूमिका म्हणजे अशीही बनवा बनवी या सिनेमातली धनंजय मानेची भूमिका आहे. तसंच ‘पांडू हवालदार’ या सिनेमात त्यांनी दादा कोंडकेंसह अभिनय केला. तसंच ‘राम राम गंगाराम’ या दोन चित्रपटांमध्ये दादा कोंडके यांच्यासह त्यांनी भूमिका केल्या. त्या दोन सिनेमांमधला अभिनयही लोकांच्या लक्षात आहे.“माझ्या मनात अत्यंत संमिश्र भावना आहेत. हा पुरस्कार मिळणं ही अत्यंत मानाची आणि आनंदाची गोष्ट आहे. आजवर ज्या थोर लोकांना हा पुरस्कार मिळाला आहे आज मला त्यांच्या बरोबरीने नेऊन बसवलं आहे ही माझ्यासाठी फार मोठी गोष्ट आहे.‘महाराष्ट्र भूषण’ हा महाराष्ट्राचा नंबर वन पुरस्कार आहे असं मी समजतो. गेली ५० वर्षं मी चित्रपट, नाटक, मालिका करतोय त्यातली मेहनत कुठेतरी सत्कारणी लागली अन् प्रेक्षकांनीही त्याला दाद दिली त्याचा मला प्रचंड आनंद आहे”, असं अशोक सराफ म्हणाले.अशी ही बनवाबनवीसह मराठीतील असंख्य मराठी चित्रपट आणि नाटकांतून रसिकमनाचे मनोरंजन करणारे मराठीतील ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना मानाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. २०२३ सालचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार अशोक सराफांना जाहीर झाल्यानंतर सर्व स्तरांतून त्यांचं कौतुक केलं जातंय.

### मराठीत कलाकारांचा तुटवडा नाही

“अशोक सराफ यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर झाला, त्याबद्दल अशोक सरांचे मनापासून अभिनंदन. मी मागे एकदा म्हणालो तसं, एकाच वेळेला सिनेमा, रंगभूमी आणि टीव्ही ह्या तिन्ही माध्यमांवर हुकूमत गाजवणारे चतुरस्त्र कलाकार ह्या देशाने खूप कमी पाहिले, अशोक सर त्यातले एक”, अशा शब्दांत राज ठाकरेंनी अशोक सराफ यांचं अभिनंदन केलं.“मराठीत कलाकारांचा अजिबात तुटवडा नाही, पण आपल्या भाषेच्या सीमा ओलांडून एखादा नट देशव्यापी ओळखला जातोय किंवा त्यासाठी प्रयत्न करतोय असं दिसत नाही. पण अशोक सर ह्या बाबतीत देखील अपवाद ठरले. महाराष्ट्र भूषणसारखे राज्यातील सर्वोच्च नागरी पुरस्कार कलाकारांना ते उमेदीत असताना मिळावेत असं मला वाटतं. अर्थात हे प्रत्येक वेळेला होतंच असं नाही पण अशोक सरांच्या बाबतीत राज्य सरकारने योग्य टप्प्यावर त्यांचा उचित सन्मान केला ह्याबद्दल राज्य सरकारचं पण मनापासून अभिनंद”, असंही ते म्हणाले.मूळचे बेळगावचे असणाऱ्या अशोक सराफ यांचा जन्म मुंबईत झाला.दक्षिण मुंबईतील चिखलवाडी या भागात त्यांचे बालपण गेलं. गोपीनाथ सावकार हे त्यांचे मामा होत. अशोक सराफ यांचे शिक्षण मुंबईतील डी.जी.टी. विद्यालयात झाले.

# महाविकास आघाडीत वंचित आघाडीचाही समावेश

## आज महाविकास आघाडीचा विस्तार झालेला आहे : संजय राऊत

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाविकास आघाडीची आज नरीमन पॉइंट येथील ट्रायडंट हॉटेलमध्ये बैठक बोलावण्यात आली होती. ही बैठक नुकतीच संपली असून ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी माध्यमांशी संवाद साधला. या बैठकीत कोणत्या मुद्द्यांवर चर्चा झाली, कोणत्या पक्षांना महाविकास आघाडीत सामिल करून घेतले याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली.**

बैठक संपल्यानंतर संजय राऊत म्हणाले, काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना (ठाकरे गट) या महाविकास आघाडीच्या प्रमुख पक्षांची महत्त्वाची बैठक सकाळी सुरू झाली. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, वर्षा गायकवाड, ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, नेते जितेंद्र आव्हाड, अनिल देशमुख, मी आणि विनायक राऊत या बैठकीला उपस्थित होतो. आजच्या बैठकीत आमची प्रदीर्घ चर्चा झाली. आज बरेच निर्णय झाले. मुख्यत्त्वे आज महाविकास आघाडीचा विस्तार झालेला आहे.“आज महाविकास आघाडीमध्ये सीपीआयएम, सीपीआय, शेतकरी कामगार



पक्ष, जनता दल युनायटेड, वंचित बहुजन आघाडी, समाजवादी पार्टी, शेकाप या सगळ्यांचा समावेश महाविकास आघाडीत झाला आहे. या सगळ्या प्रमुख नेत्यांशी व्यवस्थित सकारात्मक चर्चा झाली. महाविकास आघाडी अधिक मजबुतीने पुढे जातेय. नवीन मित्र आम्हाला मिळाले आहेत”, असंही संजय राऊत म्हणाले.दरम्यान, महाविकास आघाडीच्या बैठकीत वंचित बहुजन आघाडीच्या नेत्यांचा अपमान झाला असा आरोप वंचितचे प्रवक्ते धैर्यवर्धन पुंडकर यांनी केला होता. त्यांना बैठकीच्या बाहेर तास-दीडतास थांबवून ठेवलं होतं, असं ते म्हणाले. त्यावर संजय राऊत म्हणाले, मला असं वाटतं हा गैरसमज पोहोचलेला आहे. वंचित आघाडीचे तीन प्रमुख नेते प्रकाश आंबेडकर यांनी पाठवले होते. ते आजच्या बैठकीत सकाळपासून आमच्याबरोबर चर्चेला बसले होते. आम्ही एकत्र जेवण केलं आहे आणि चांगल्या प्रकारे चर्चा झाली. त्यांना जे पत्र हवं होतं तेही आज त्यांना दिलं आहे.. २ तारखेच्या बैठकीला प्रकाश आंबेडकर उपस्थित राहणार आहेत, असंही ते म्हणाले.

### भाजपा विरोधात लढणं प्राथमिकता

प्रकाश आंबेडकर म्हणाले, “महाविकास आघाडीच्या बैठकीत वंचित बहुजन आघाडीचे उपाध्यक्ष यांचा अपमान झाला. वंचित बहुजन आघाडीला महाविकास आघाडीत समाविष्ट करून घेण्याबाबतच्या पत्रात नाना पटोलेंना सही करण्याचा अधिकार आहे की नाही हे अखिल भारतीय काँग्रेस कमिटी किंवा रमेश चेन्नथीलाल यांनी स्पष्ट केलं नसलं तरीही आम्ही महाविकास आघाडीच्या पुढच्या बैठकीत सहभागी होणार आहोत. कारण, भाजपा-आरएसएस विरोधात लढणं ही आमची प्राथमिकता आहे.”

# नितीश कुमार कुठे फसले?

## » राहुल गांधी यांनी नितीश कुमार यांच्या जोरदार केली टीका

| नवी दिल्ली |

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी इंडिया आघाडीतून बाहेर पडून भाजपासह सरकार स्थापन केल्यानंतर आज पहिल्यांदाच राहुल गांधी यांनी त्यांच्यावर जाहीर भाष्य केले. राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा बिहारमध्ये पोहोचली आहे. बिहारच्या पुर्णिया जिल्ह्यात आज जाहीर सभेला संबोधित करत असताना राहुल गांधी यांनी नितीश कुमार यांच्यावर टीकास्र सोडले. नितीश कुमार इंडिया आघाडीतून बाहेर का पडले? याचे कारण सांगतानाच राहुल गांधी यांनी नितीश कुमार यांच्या कोलांटउड्याबाबत बिहारमध्ये एक विनोद तयार झाला असल्याचेही सांगितले.**



“नितीश कुमार कुठे फसले? हे मी तुम्हाला सांगतो. बिहारमध्ये जातनिहाय सर्व्हे करावा, अशी मागणी आम्ही नितीश कुमार यांच्याकडे केली होती. काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दलाने नितीश कुमार यांच्यावर दबाव टाकून सर्व्हे करून घेतला. पण दुसऱ्या बाजूनेही त्यांच्यावर दबाव आला. कारण भाजपाला या देशात जातनिहाय सर्व्हे करायचा नाही. या देशात दलित, आदिवासी, वंचित यांची संख्या किती? हे भाजपाला जाणून घ्यायचे नाही. त्यामुळे भाजपाच्या दबावापुढे नितीश कुमार झुकले. भाजपाने त्यांना मार्ग दाखविला आणि नितीश कुमार त्या मार्गाने चालू पडले”, असे भाष्य राहुल गांधी यांनी जाहीर सभेत केले.राहुल गांधी पुढे म्हणाले, “भाजपाला सामाजिक न्यायाचे तत्त्व मान्य नाही. पण इंडिया आघाडी म्हणून आम्ही सामाजिक न्यायाची भूमिका मांडत राहू आणि त्यासाठी आम्हाला नितीश कुमार यांची गरज नाही.” राहुल गांधी यांनी यावेळी म्हणाले की, आम्ही देशातील बेरोजगारी आणि आर्थिक विषमतेकडेही लक्ष वेधले. सत्ताधारी भाजपा या प्रश्नांची सोडवणूक करण्याऐवजी द्वेषाची पेरणी करत आहे. ज्यामुळे सामाजिक आणि आर्थिक विषयाकडून दुर्लक्ष होत असल्याचीही टीकाही राहुल गांधी यांनी केली.या जाहीर सभेत राहुल गांधी यांनी नितीश कुमार यांच्याबाबतचा एक विनोदही ऐकून दाखविला. ते म्हणाले, “बिहारचे मुख्यमंत्री राज्यपालांकडे शपथविधीसाठी गेले. खूप धामधूम सुरू होती. भाजपाचे नेते, राज्यपाल आणि आमदार त्याठिकाणी बसले होते. नितीश कुमार मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतात आणि सर्वांची सदिच्छा भेट घेऊन निघून जातात. रस्त्यात त्यांना आठवते की, त्यांची शाल राज्यपाल भवनातच राहिली. ते चालकाला सांगतात की, पुन्हा राज्यपाल भवनात चल. चालक वाहन वळवतो आणि राज्यपाल भवनाकडे निघतो. नितीश कुमारांना पुन्हा आलेले पाहून राज्यपाल म्हणतात, इतक्या लवकर परत (शपथविधीसाठी) आलात.” “बिहारची अवस्था अशी आहे की, मुख्यमंत्र्यांवर थोडासा दबाव पडला तरी ते यु-टर्न घेतात”, अशी बोचरी टीका राहुल गांधी यांनी केली.राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा सध्या बिहारमध्ये आहे. यावेळी त्यांना नितीश कुमारांच्या इंडिया आघाडी सोडण्याच्या निर्णयाबाबत विचारले असता राहुल गांधी म्हणाले की, मी त्यांना ( नितीश कुमार) सरळ सांगितले होते की,

### राज्यपाल भवनातच शाल राहिली

» राहुल गांधी पुढे म्हणाले, “भाजपाला सामाजिक न्यायाचे तत्त्व मान्य नाही. पण इंडिया आघाडी म्हणून आम्ही सामाजिक न्यायाची भूमिका मांडत राहू आणि त्यासाठी आम्हाला नितीश कुमार यांची गरज नाही.” राहुल गांधी यांनी यावेळी म्हणाले की, आम्ही देशातील बेरोजगारी आणि आर्थिक विषमतेकडेही लक्ष वेधले. सत्ताधारी भाजपा या प्रश्नांची सोडवणूक करण्याऐवजी द्वेषाची पेरणी करत आहे. ज्यामुळे सामाजिक आणि आर्थिक विषयाकडून दुर्लक्ष होत असल्याचीही टीकाही राहुल गांधी यांनी केली.या जाहीर सभेत राहुल गांधी यांनी नितीश कुमार यांच्याबाबतचा एक विनोदही ऐकून दाखविला. ते म्हणाले, “बिहारचे मुख्यमंत्री राज्यपालांकडे शपथविधीसाठी गेले. खूप धामधूम सुरू होती. भाजपाचे नेते, राज्यपाल आणि आमदार त्याठिकाणी बसले होते. नितीश कुमार मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतात आणि सर्वांची सदिच्छा भेट घेऊन निघून जातात. रस्त्यात त्यांना आठवते की, त्यांची शाल राज्यपाल भवनातच राहिली. ते चालकाला सांगतात की, पुन्हा राज्यपाल भवनात चल. चालक वाहन वळवतो आणि राज्यपाल भवनाकडे निघतो. नितीश कुमारांना पुन्हा आलेले पाहून राज्यपाल म्हणतात, इतक्या लवकर परत (शपथविधीसाठी) आलात.

‘तुम्हाला बिहारमध्ये जात जनगणना करावी लागेल’. काँग्रेससह राष्ट्रीय जनता दलाने नितीश कुमारांकडे जातनिहाय सर्वेक्षण करण्याचा आग्रह धरला; पण भाजप घाबरले. त्यांनी याला विरोध केला. त्यामुळे नितीश कुमार यांना भाजपने त्यांना पळून जाण्यासाठी मागच्या दाराची सोय केली!.“नितीश कुमार कुठे फसले? हे मी तुम्हाला सांगतो. बिहारमध्ये जातनिहाय सर्व्हे करावा, अशी मागणी आम्ही नितीश कुमार यांच्याकडे केली होती. काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दलाने नितीश कुमार यांच्यावर दबाव टाकून सर्व्हे करून घेतला. पण दुसऱ्या बाजूनेही त्यांच्यावर दबाव आला. कारण भाजपाला या देशात जातनिहाय सर्व्हे करायचा नाही. या देशात दलित, आदिवासी, वंचित यांची संख्या किती? हे भाजपाला जाणून घ्यायचे नाही. त्यामुळे भाजपाच्या दबावापुढे नितीश कुमार झुकले. भाजपाने त्यांना मार्ग दाखविला आणि नितीश कुमार त्या मार्गाने चालू पडले.

# इम्रान खान यांना सिफर प्रकरणात तुरुंगवास!

## » सिफर प्रकरणात न्यायालयाने 10 वर्षांची शिक्षा सुनावली

| नवी दिल्ली |

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**पाकिस्तानचे माजी पंतप्रधान आणि पीटीआयचे प्रमुख इम्रान खान यांना सिफर प्रकरणात न्यायालयाने १० वर्षांची शिक्षा सुनावली आहे. इम्रान खान यांचे माजी सहयोगी आणि माजी परराष्ट्र मंत्री शाह महमूद कुरैशी यांनाही १० वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आहे. इम्रान खान आणि महमूद कुरैशी यांच्या विरोधातला सिफर प्रकरण हे राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित आहेत.**

इम्रान खान यांनी अत्यंत गोपनीय माहिती ही सार्वजनिक केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. सत्तेतून इम्रान खान यांना बेदखल करण्यात आलं त्यानंतर त्यांनी यामागे अमेरिका असल्याचं म्हटलं होतं. असोसिएटेड प्रेसने हे वृत्त दिलं आहे.इम्रान खान आणि त्यांचे सहकारी आणि माजी परराष्ट्र मंत्री शाह महमूद कुरैशी यांनाही दहा वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर इम्रान खान यांना हा मोठा झटका मानला जातो आहे. त्यामुळे पाकिस्तानच्या राजकारणात एकच खळबळ उडाली आहे. कोर्टाच्या



या निर्णयामुळे इम्रान खान यांच्या समर्थकांमध्ये प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली आहे.सिफरचं हे प्रकरण राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित आहे. अत्यंत गुप्त माहिती वैयक्तिक कारणासाठी वापरल्याचा इम्रान खान यांच्यावर आरोप आहे. सत्तेपासून बेदखल झाल्यानंतर इमरान खान यांनी थेट अमेरिकेवर आरोप केला होता. मला सत्तेतून बेदखल करण्यामागे अमेरिकेचा हात असल्याचा आरोप इमरान खान यांनी केला होता. वॉशिंग्टन येथील एका एम्बेसीने मला एक

### पाकिस्तानमध्ये निवडणूक

» पाकिस्तानमध्ये ८ फेब्रुवारीच्या दिवशी निवडणूक होणार आहे. त्याआधी माजी पंतप्रधान नवाज शरीफ पाकिस्तानला परतले आहेत. त्यांनी २०१९ मध्ये पाकिस्तान सोडलं होतं आणि ब्रिटनला राहिलो हेत. मात्र उच्च न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला त्यानंतर नवाज शरीफ पाकिस्तानला परतले आहेत. आता निवडणुकांसाठी अवघे नऊ दिवस उरलेले असताना इम्रान खान यांना दहा वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.पाकिस्तानचे माजी पंतप्रधान आणि पीटीआयचे प्रमुख इम्रान खान यांना सिफर प्रकरणात न्यायालयाने १० वर्षांची शिक्षा सुनावली आहे. इम्रान खान यांचे माजी सहयोगी आणि माजी परराष्ट्र मंत्री शाह महमूद कुरैशी यांनाही १० वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

गुप्त टेप पाठवली होती, असा दावाही इम्रान खान यांनी केला होता. इम्रान खान यांनी आपल्या राजकीय फायद्यासाठी वादग्रस्त गोष्टी सार्वजनिक केल्या होत्या. त्यालाच सिफर असं म्हटलं जातं.

# रणदीप हुड्डाने जाहीर केली सावरकर' चित्रपट प्रदर्शनाची तारीख

अभिनेता रणदीप हुड्डा बॉलिवूडच्या सर्वोत्कृष्ट अभिनेत्यांपैकी एक मानला जातो. गेले काही महिने त्याचा 'स्वातंत्र्यवीर सावरकर' हा चित्रपट फारच चर्चेत आहे. या चित्रपटाच्या घोषणेपासूनच सर्वांचं लक्ष या चित्रपटाकडे लागलं आहे. या चित्रपटाच्या कामात काय प्रगती होत आहे हे वेळोवेळी चित्रपटाच्या टीमने प्रेक्षकांशी शेअर केलं आहे. अभिनेत्याने नुकतंच या चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या तारखेबद्दल खुलासा केला आहे. सर्वप्रथम हा चित्रपट प्रसिद्ध निर्माते व दिग्दर्शक महेश मांजरेकर दिग्दर्शित करणार होते. नंतर मांजरेकरांनी यातून काढता पाय घेतल्यानंतर यातील प्रमुख अभिनेता रणदिप हुड्डाने याच्या दिग्दर्शनाची जबाबदारी घेतली. मध्यंतरी या चित्रपटाची एक झलक शेअर करण्यात आली अन् यावर्षी जानेवारीमध्ये हा चित्रपट येणार अशी चर्चादेखील होत होती. पण नंतर बरेच महीने याबद्दल काहीच माहिती समोर आली नाही. आज महात्मा गांधींच्या पुण्यतिथीनिमित्त एक पोस्ट शेअर करत रणदीप हुड्डाने या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर केली



आहे.एक खास व्हिडीओ शेअर करत रणदीप हुड्डाने प्रदर्शनाची तारीख जाहीर केली आहे. ही पोस्ट शेअर करताना त्याने लिहिलं, "भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील दोन हीरो, एकाला लोकांनी डोक्यावर घेतलं तर दुसऱ्याला इतिहासाच्या पानांतून वगळलं. आज या दिवशी इतिहास पुन्हा लिहिला जाईल." अशी पोस्ट शेअर करत रणदीपने या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर केली.२२ मार्च २०२४ रोजी हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे हा चित्रपट प्रामुख्याने हिंदी आणि मराठी अशा दोन्ही भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे. 'स्वातंत्र्यवीर सावरकर' या चित्रपटात रणदीप हुड्डासह अंकिता लोखंडे व अमित सियाल हे कलाकार प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. या चित्रपटासाठी रणदीप हुड्डानेही प्रचंड मेहनत घेतलेली आहे. प्रेक्षक त्याला या भूमिकेत पाहण्यासाठी फारच उत्सुक आहेत. अभिनेता रणदीप हुड्डा बॉलिवूडच्या सर्वोत्कृष्ट अभिनेत्यांपैकी एक मानला जातो. गेले काही महिने त्याचा 'स्वातंत्र्यवीर सावरकर' हा चित्रपट फारच चर्चेत आहे. या चित्रपटाच्या घोषणेपासूनच सर्वांचं लक्ष या चित्रपटाकडे लागलं आहे. या चित्रपटाच्या कामात काय प्रगती होत आहे.

## शाहरुखने ब्रेक का घेतला

बॉलीवूडचा बादशाह म्हणून शाहरुख खानला ओळखले जाते. आपल्या अभिनयाच्या जोरावर शाहरुखने प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. अभिनयाबरोबरच शाहरुख त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळेही अनेकदा चर्चेत असतो. गेल्यावर्षी त्याचा 'पठाण' चित्रपट प्रदर्शित झाला. बॉक्स ऑफिसवर या चित्रपटाने रेकॉर्डतोड कमाई केली होती. या चित्रपटातून शाहरुखने तब्बल चार वर्षांनंतर पुनरागमन केले. पण, शाहरुखने कमबॅक करण्यासाठी चार वर्ष का लावले, असा प्रश्न अनेक चाहत्यांना पडला होता. आता नुकतेच शाहरुखने आपल्या चार वर्षांच्या ब्रेकबाबत खुलासा केला आहे.नुकत्याच एका कार्यक्रमादरम्यान शाहरुखने चार वर्ष ब्रेकबाबत भाष्य केले आहे. तो म्हणाला, "गेली ३३ वर्ष मी अभिनय क्षेत्रात काम करत आहे. पहिल्यांदाच मी एवढा मोठा ब्रेक घेतला. या अगोदर मी काही चित्रपट केले होते, मात्र ते चित्रपट एवढे खास चालले नाहीत. त्यामुळे मला वाटलं मी चांगले चित्रपट बनवत नाहीये.

## मृणालचा मॅटॅलिक-सिल्व्हर गाऊन



मराठी अभिनेत्री मृणाल ठाकूर ( MRUNAL THAKUR ) तिच्या वैयक्तिक जीवनासोबत नवनविन हटके लूकमुळे नेहमीच चर्चेत असते. सध्या मृणालचा ब्लॅक रंगाच्या साडीतील एकदम परफेक्ट लूक समोर आला आहे. दरम्यान नुकत्याच काल पार पाडलेल्या फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्यात रेड कार्पेटवरही ती झळकली. दोन्ही व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर होताच चाहत्यांनी भरभरून कौतुकाचा वर्षाव केलाय अभिनेत्री मृणाल ठाकूर तिच्या अप्रतिम अभिनयासोबत निखल सौंदर्यासाठी ओळखली जाते. नुकतेच मृणालने तिच्या इन्स्टाग्रामवर ब्लॅक रंगाच्या साडीतील काही फोटो आणि व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओत ती समुद्राच्या किनाऱ्यावर शूट करताना दिसत आहे. याशिवाय तिच्या हातातील एका छोट्या पर्सनं चाहत्यांचे लक्ष वेधून घेतलंय. दरम्यान समुद्राच्या किनाऱ्यावर अनेक पर्यटक आणि शूटिंग घेणाऱ्या व्यक्तिही दिसत आहेत. हिरवा निर्सग, नारळाची झाडे, रेस्टॉरंट, मेकअप आर्टिस्ट, निखळ समुद्राचे पाणी, लाकडी झोका आणि आजूबाजूची वाळू या सर्व गोष्टी दिसत आहेत. हा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर होताच चाहत्यांनी तिच्या सौंदर्याचे भरभरून कौतुक करताना कॉमेन्टस केल्या आहेत.दरम्यान काल पार पडलेल्या फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्यात मृणालने हजेरी लावत रेड कार्पेटवर झळकली. यावेळी तिने लव्हेंडर कलरचा मॅटॅलिक-सिल्व्हर गाऊन परिधान केलाय. यावेळी ती खूपच सुंदर आणि ग्लॅमरस लूकमध्ये दिसली. मोकळ्या केसांची स्टाईल, कानात छोटे इअररिंग्स, हातात अंगठी, हाय हिल्स आणि मेकअपने तिने तिचा लूक पूर्ण केला होता. हा व्हिडिओ विरल भयानी इन्स्टाग्रामवर व्हायरल झाला आहे. या व्हिडिओवरही चाहत्यांनी कॉमेन्टसचा पाऊस पाडलाय.मराठी अभिनेत्री मृणाल ठाकूर ( MRUNAL THAKUR ) तिच्या वैयक्तिक जीवनासोबत नवनविन हटके लूकमुळे नेहमीच चर्चेत असते. सध्या मृणालचा ब्लॅक रंगाच्या साडीतील एकदम परफेक्ट लूक समोर आला आहे. दरम्यान नुकत्याच काल पार पाडलेल्या फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्यात रेड कार्पेटवरही ती झळकली. दोन्ही व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर होताच चाहत्यांनी भरभरून कौतुकाचा वर्षाव केलाय अभिनेत्री मृणाल ठाकूर तिच्या अप्रतिम अभिनयासोबत निखल सौंदर्यासाठी ओळखली जाते. नुकतेच मृणालने तिच्या इन्स्टाग्रामवर ब्लॅक रंगाच्या साडीतील काही फोटो आणि व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओत ती समुद्राच्या किनाऱ्यावर शूट करताना दिसत आहे.

## 'गुंडा' चित्रपटाबद्दल ऋषी प्रथमच उघडपणे बोलले

कांती शाह दिग्दर्शित 'गुंडा' हा चित्रपट आजही गिल्टी प्लेजर म्हणून कित्येक लोक आजही बघतात. ९० च्या दशकाच्या अखेरीस आलेला 'गुंडा' हा एक बी ग्रेड मसाला चित्रपट आहे, पण यात तुम्हाला चित्रपटसृष्टीतील नावाजलेले कलाकार काम करताना पाहायला मिळतात. आजही या चित्रपटातील कित्येक वादग्रस्त डायलॉग लोकांना तोंडपाठ आहेत. अश्लील संवाद, दृश्य, हिंसा अन् बेताल कथा यामुळे हा चित्रपट तेव्हा फ्लॉप जरी ठरला असला तरी त्याची चर्चा मात्र भरपुर झाली. नुकतंच या चित्रपटाबद्दल मुकेश ऋषी यांनी भाष्य केलं आहे. या चित्रपटात काम करणं ही मुकेश यांना त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठी चूक वाटते. हा चित्रपट करायला त्यांनी होकार कसा दिला हेदेखील त्यांना ठाऊक नसल्याचा खुलासा मुकेश ऋषी यांनी केला. हा चित्रपट इंटरनेटमुळे चांगलाच चर्चेत आला याची माहिती मुकेश यांना चक्क सैफ अली खानने दिली होती.'लेहरन रेट्रो'शी संवाद साधताना मुकेश म्हणाले, "चित्रपटाचं चित्रीकरण सुरू झाल्यावरच माझ्या ध्यानात आलं की ही खूप मोठी चूक आहे. एका ज्येष्ठ अभिनेत्यानेही याबाबतीत माझ्याकडे तक्रार केली की मी असे चित्रपट का करतोय म्हणून.प्रदर्शनानंतर डिजिटल विश्वातील या चित्रपटाची क्रेझ होती. माझे पात्र बुल्ला हे किती लोकप्रिय आहे याची माहिती मला सैफ अली खानकडून मिळाली. मी आणि सैफ एका प्रोजेक्टसाठी हैद्राबादला जात असताना त्याने मला 'गुंडा'च्या लोकप्रियतेबद्दल सांगितले." पुढे मुकेश म्हणाले, "आजच्या नव्या पिढीला हा चित्रपट पसंत पडला आहे. मी आज कुठेही गेलो की मला बुल्लाचे संवाद म्हणून दाखवण्याची फर्माईश केली जाते. जेव्हा मी हा चित्रपट करत होतो तेव्हा मी फार साशंक होतो, पण आजची पिढी अशा चित्रपटाकडे गमंत म्हणून वेगळ्याच दृष्टिकोनातून बघते. विचार केला नव्हता की हा चित्रपट लोकांना एवढा आवडेल अन् रिलीजच्या २० ते २५ वर्षांनी यावर एवढी चर्चा होईल.




## ट्विंकलने निताराबाबतचा सांगितला किस्सा

अभिनेता अक्षय कुमार व अभिनेत्री ट्विंकल खन्ना बॉलीवूडमधील लोकप्रिय कपल आहेत. आपल्या चित्रपटांबरोबरच ते वैयक्तिक कारणांमुळेही नेहमी चर्चेत असतात. अक्षय व ट्विंकल सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात सक्रिय असतात. निरनिराळे फोटो व व्हिडीओ शेअर करत ते चाहत्यांना अपडेट देत असतात. अक्षय व ट्विंकलप्रमाणेच त्यांची दोन्ही मुलं आरव (वय २१) व नितारा (वय ११ वर्ष) चर्चेत असतात. अनेकदा दोघे आपल्या मुलांचे फोटो चाहत्यांबरोबर शेअर करत असतात. दरम्यान, एका मुलाखतीत ट्विंकलने निताराबाबतचा एक किस्सा सांगितला आहे. नुकतंच ट्विंकलने टाइम्स ऑफ इंडियामध्ये लिहिलेल्या लेखात निताराबरोबर घडलेल्या भयानक घटनेबाबत माहिती दिली. ट्विंकल म्हणाली, "गेल्या ख्रिसमसमध्ये कोणीतरी आरव आणि निताऱासमोर चिकनची प्लेट ठेवली होती. त्यावेळी फ्रेडी (पाळीव श्वान) मुलांच्या जवळपासच होता. त्याने प्लेटवर उडी मारली आणि चिकनचे तुकडे खायला सुरुवात केली. निताराला भीती वाटत होती की फ्रेडी लाकडाची काठीदेखील खाईल. त्यामुळे तिने ती काठी बाजूला करण्याचा प्रयत्न केला.

# न्यूझीलंडसमोर 296 धावांचे लक्ष्य!

## भारताने 8 गडी गमावून 295 धावांचा डोंगर उभारला

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**अंडर-१९ विश्वचषकातील सुपर सिक्स स्पर्धेतील पहिला सामना ब्लोमफॉन्टेन येथील मंगॉंग ओव्हल येथे खेळला जात आहे. या सामन्यात भारत आणि न्यूझीलंड आमनेसामने आहेत. या सामन्यात भारतीय संघाने नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना मुशीर खानच्या शतकाच्या जोरावर ८ गडी गमावून २९५ धावांचा डोंगर उभारला. त्याचबरोबर न्यूझीलंडसमोर २९६ धावांचे लक्ष्य ठेवले आहे.**



मुशीर खानचे या स्पर्धेतील हे दुसरे शतक ठरले. न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यातील या खेळीसह तो या स्पर्धेत सर्वाधिक धावा करणारा खेळाडूही ठरला. त्याने १०९ चेंडूत १० चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने आपले शतक पूर्ण केले. त्याने १२६ चेंडूत १३१ धावांची खेळी साकारली आहे. तर, आदर्श सिंगने ५२ धावा केल्या. न्यूझीलंडकडून मेसन क्लार्कने सर्वाधिक चार विकेट्स घेतल्या. टीम इंडियाची सुरुवात खराब झाली. अर्शिन कुलकर्णी नऊ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. यानंतर आदर्शने मुशीरसोबत दुसऱ्या विकेटसाठी ७७ चेंडूत ७७ धावांची भागीदारी केली. आदर्श ५८ चेंडूंत सहा चौकारांच्या मदतीने ५२ धावा करून बाद झाला. यानंतर कर्णधार उदय सहारनने मुशीरबरबर ८७ धावांची भागीदारी केली. मोठ्या फटकेबाजीच्या नादात उदयने आपली विकेट गमावली. तो ३४ धावा करून बाद झाला. यानंतर ठराविक अंतराने विकेट पडत राहिल्या. अरावेली अवनीश १७ धावा करून बाद झाला, प्रियांशू मोलिया १० धावा करून बाद झाला, सचिन दास १५ धावा करून बाद झाला.मुशीर खानचे या स्पर्धेतील हे दुसरे शतक ठरले. न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यातील या खेळीसह तो या स्पर्धेत सर्वाधिक धावा करणारा खेळाडूही ठरला. त्याने १०९ चेंडूत १० चौकार आणि १ षटकाराच्या मदतीने आपले शतक पूर्ण केले. त्याने १२६ चेंडूत १३१ धावांची खेळी साकारली आहे.दोन शतकांशिवाय मुशीर खानने अर्धशतकही झळकावले आहे. त्याने या स्पर्धेत जवळपास ३०० धावा केल्या आहेत.एकीकडे लहान भाऊ अंडर-१९ विश्वचषकात धुमाकूळ घालत आहे, तर दुसरीकडे रणजी स्टार आणि मुशीरचा मोठा भाऊ सरफराज खानचा कसोटीसाठी भारतीय संघात समावेश करण्यात आला आहे. खरं तर, या दिवसांत इंग्लंडविरुद्ध खेळल्या जाणाऱ्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील दुसऱ्या सामन्यासाठी भारतीय संघात सरफराजचा बदली खेळाडू म्हणून समावेश करण्यात आला आहे.मुशीर खानचे या स्पर्धेतील हे दुसरे शतक ठरले. न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यातील या खेळीसह तो या स्पर्धेत सर्वाधिक धावा करणारा खेळाडूही ठरला. त्याने १०९ चेंडूत १० चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने आपले शतक पूर्ण केले. त्याने १२६ चेंडूत १३१ धावांची खेळी साकारली आहे. तर, आदर्श सिंगने ५२ धावा केल्या. न्यूझीलंडकडून मेसन क्लार्कने सर्वाधिक चार विकेट्स घेतल्या. टीम इंडियाची सुरुवात खराब झाली. अर्शिन कुलकर्णी नऊ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. यानंतर आदर्शने मुशीरसोबत दुसऱ्या विकेटसाठी ७७ चेंडूत ७७ धावांची भागीदारी केली. आदर्श ५८ चेंडूंत सहा चौकारांच्या मदतीने ५२ धावा करून बाद झाला. यानंतर कर्णधार उदय सहारनने मुशीरबरबर ८७ धावांची भागीदारी केली. मोठ्या फटकेबाजीच्या नादात उदयने आपली विकेट गमावली. तो ३४ धावा करून बाद झाला. यानंतर ठराविक अंतराने विकेट पडत राहिल्या. अरावेली अवनीश १७ धावा करून बाद झाला, प्रियांशू मोलिया १० धावा करून बाद झाला, सचिन दास १५ धावा करून बाद झाला.मुशीर खानचे या स्पर्धेतील हे दुसरे शतक ठरले. न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यातील या खेळीसह तो या स्पर्धेत सर्वाधिक धावा करणारा खेळाडूही ठरला. त्याने १०९ चेंडूत १० चौकार आणि १ षटकाराच्या मदतीने आपले शतक पूर्ण केले. त्याने १२६ चेंडूत १३१ धावांची खेळी साकारली आहे.

### सरफराजचा संघात समावेश

» एकीकडे लहान भाऊ अंडर-१९ विश्वचषकात धुमाकूळ घालत आहे, तर दुसरीकडे रणजी स्टार आणि मुशीरचा मोठा भाऊ सरफराज खानचा कसोटीसाठी भारतीय संघात समावेश करण्यात आला आहे. खरं तर, या दिवसांत इंग्लंडविरुद्ध खेळल्या जाणाऱ्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील दुसऱ्या सामन्यासाठी भारतीय संघात सरफराजचा बदली खेळाडू म्हणून समावेश करण्यात आला आहे.अंडर-१९ विश्वचषकातील सुपर सिक्स स्पर्धेतील पहिला सामना ब्लोमफॉन्टेन येथील मंगॉंग ओव्हल येथे खेळला जात आहे. या सामन्यात भारत आणि न्यूझीलंड आमनेसामने आहेत.

# फिरकीपटू हरभजन सिंगने टीम इंडियाला दिला इशारा

## भारत टर्निंग ट्रॅक तयार करून आपल्याच जाळ्यात अडकू शकतो

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यापूर्वी टीम इंडियाला दुहेरी धक्का बसला आहे. केएल राहुल आणि रवींद्र जडेजा दुखापतीमुळे दुसऱ्या कसोटीतून बाहेर पडले आहेत. या दोघांच्या जागी सरफराज खान, सौरभ कुमार आणि वॉशिंग्टन सुंदर यांचा भारतीय कसोटी संघात समावेश करण्यात आला आहे. दरम्यान, हरभजन सिंग म्हणाला की, टीम इंडियाला जडेजा आणि केएल राहुलची उणीव भासेल कारण नवीन संघात अनुभवाची कमतरता आहे.**

हरभजन सिंगने त्याच्या यूट्यूब चॅनलवर सांगितले की, "रवींद्र जडेजा आणि केएल राहुल दुखापतीमुळे संघाबाहेर आहेत. हे दोघे कधी परततील हे सध्या तरी माहीत नाही. विराट कोहली आधीच बाहेर आहे. तो असता तर भारतीय फलंदाजी त्याच्या उपस्थितीमुळे आणखी मजबूत झाली असती. शुबमन गिल फॉर्ममध्ये नाही आणि बऱ्याच दिवसापासून श्रेयसच्या बॅटमधून धावा होत नाहीत. अशा परिस्थितीत संघात अनुभवाची कमतरता आहे. होय, हे खरे आहे की रोहित शर्मा आहे. मात्र, दुसरा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आर अश्विन आहे. याचा अर्थ भारतीय फलंदाजी कमकुवत दिसत आहे."हरभजन



पुढे म्हणाला, "मला वाटते भारत दुसऱ्या कसोटीत टर्निंग ट्रॅकवर खेळेल. कारण सुंदर आणि सौरभ यांना संघात सामील केले आहे. संघात आर अश्विन, अक्षर पटेल आणि कुलदीप यादव आधीपासूनच आहेत. भारत टर्निंग ट्रॅक तयार करून ते स्वत:च्याच जाळ्यात अडकणार नाहीत याची काळजी घ्यावी लागेल. भारतीय बॅटिंग युनिट तरुण आहे, त्यांना वेळ हवा आहे आणि जर त्यांना चांगली विकेट मिळाली तर ते चांगली कामगिरी करू शकतात."रोहित शर्मा (कर्णधार), शुबमन गिल, यशस्वी जैस्वाल, श्रेयस अय्यर, केएस भरत (यष्टीरक्षक), ध्रुव जुरेल (यष्टीरक्षक), रविचंद्रन अश्विन, अक्षर पटेल, कुलदीप यादव, मोहम्मद सिराज, मुकेश कुमार, जसप्रीत बुमराह (उपकर्णधार), आवेश खान, रजत पाटीदार, सरफराज खान, वॉशिंग्टन सुंदर आणि सौरभ कुमार.हरभजन सिंगने त्याच्या यूट्यूब चॅनलवर सांगितले की, "रवींद्र जडेजा आणि केएल राहुल दुखापतीमुळे संघाबाहेर आहेत. हे दोघे कधी परततील हे सध्या तरी माहीत नाही. विराट कोहली आधीच बाहेर आहे. तो असता तर भारतीय फलंदाजी त्याच्या उपस्थितीमुळे आणखी मजबूत झाली असती. शुबमन गिल फॉर्ममध्ये नाही आणि बऱ्याच दिवसापासून श्रेयसच्या बॅटमधून धावा होत नाहीत. अशा परिस्थितीत संघात अनुभवाची कमतरता आहे. होय, हे खरे आहे की रोहित शर्मा आहे.

### भारतीय फलंदाजी कमकुवत

» मात्र, दुसरा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आर अश्विन आहे. याचा अर्थ भारतीय फलंदाजी कमकुवत दिसत आहे. "मला वाटते भारत दुसऱ्या कसोटीत टर्निंग ट्रॅकवर खेळेल. कारण सुंदर आणि सौरभ यांना संघात सामील केले आहे. संघात आर अश्विन, अक्षर पटेल आणि कुलदीप यादव आधीपासूनच आहेत.